MHRG120002492015

नियमीत दिवाणी दावा क्र.३६/२०१५
शकुंतला वि. अवधुत वगैरे १९

## निशाणी क्र.११४ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ७ व ९ च्या नावामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दिला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, बेलिफ रिपोर्ट नुसार प्रतिवादी क्र. ७ चे नाव 'सुशील' ऐवजी 'सुश्रृत' आणि प्रतिवादी क्र. ९ चे नाव 'सुचिता' ऐवजी 'रूचिता' असणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तूत अर्ज मंजूर करण्यास नाहरकत दर्शवली. प्रतिवादी क्र. १० ते १३, १४/१, १४/२, १५, १७ ते २० आपले म्हणणे दाखल केले नसल्यामुळे अर्ज त्यांच्या म्हणण्याविना पुढे चालविण्यात आला. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तावित दुरुस्ती तांत्रिक स्वरुपाची असल्याच्या मतास मी पोहोचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत वाद पत्रामध्ये प्रस्तावित दुरुस्ती करुन दुरुस्ती वाद पत्र सादर करावे.

३. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

सही/-

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०७/०२/२०२४

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड